## MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1982

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION) ACT, 1982

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १२ ऑक्टोबर १९८२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1982

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971, WITH RETROSPECTIVE EFFECT

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, दिनांक १४ ऑक्टोबर १९८२ ऐवजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

### सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२

### महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची पूर्वलक्षी प्रभावासह मुदत वाढविण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण,
१९७१ संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची पूर्वलक्षी प्रभावासह मुदत वाढविण्यासाठी महाराष्ट्राच्या
चा राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल
महा. त्यांची खात्री झाली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक २४ ऑगस्ट १९८२ रोजी महाराष्ट्र
अधि. कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावासह मुदतवाढ) अध्यादेश,
४७. १९८२ हा प्रख्यापित केला होता;

१९८२
चा
महा.
अध्या. **आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे;
१३. **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावासह मुदतवाढ) अधिनियम, १९८२ असे म्हणता येईल.

(२) तो ३० जून १९८२ रोजी अमलात आल्याचे समजण्यात येईल.

सन १९७१चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम १, पोट-कलम (४) मध्ये, "१९८२" या आकड्याऐवजी "१९८४" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९७१ चा महा. ४७.

व्यावृत्ती. ३. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणतीही व्यक्ती, २४ ऑगस्ट १९८२ या तारखेपूर्वी तिने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधातील कोणत्याही अपराधा-दाखल जर अशी गोष्ट ही या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाची पूर्वलक्षी प्रभावासह मुदतवाढ करण्यात आली नसती तर अपराध ठरली नसती, तर दोषी असल्याचे समजले जाणार नाही.

शंका निवारण. ४. शंका निवारणासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, ३० जून १९८२ नंतर ज्याची मुदत समाप्त होणार होती अशा मुख्य अधिनियमाची मुदत, या अधिनियमाद्वारे, ३० जून १९८४ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत, पूर्वलक्षी प्रभावासह वाढवण्यात आली असल्याने, ती केव्हाही समाप्त झाल्याचे कोणत्याही वेळी समजण्यात येणार नाही आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे त्याचे सर्व उपबंध हे, या अधिनियमाच्या कलम ३ ची प्रयोजने खेरीजकरून, सातत्याने अमलात असल्याचे मानण्यात येईल.

सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ याचे निरसन व व्यावृत्ती. ५. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावासह मुदतवाढ) अध्यादेश, १९८२ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. १९८२ चा महा. अध्या. १३.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही या अधि-नियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमान्वये केली असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.